# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.१४१/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ज्ञानदेव नामदेव भोसले,<br>मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. ज्ञानदेव नामदेव भोसले, मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांचेविरुध्द गाऱ्हाणे दि. ७.११.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ५८७ येथे शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज केला व दि. २८.८.२०१० रोजी चलन रु. ५०००/- पावती क्र. ५३४७२३२ नुसार भरले. वि.प.ने यासाठी अंदाजपत्रक दि. ३०.७.२०११ रोजी ५ अश्वशक्तीसाठी मंजूर केले आहे. जादा रोहित्राची मंजुरी आहे. हे रोहित्र काम पूर्ण होऊन कार्यान्वीत झालेले आहे, तरीही अर्जदार ग्राहकास वीज जोडणी दिलेली नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार चाचणी अहवाल दि. २३.५.२०११ रोजी दिलेला आहे, त्यामुळे हे वीज पुरवठा देणेचे काम वि.प.ने वाहिनी विस्तार असलेने दि. २८.८.२०११ पर्यत करणे गरजेचे होते. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १.३.२०११ ला तक्रार दाखल केली, त्यामध्ये दि. २८.६.२०११ ला आदेश झाले. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज पुरवठा देणेचे आदेश व्हावेत. विलंबाबद्दल भरपाई मंजूर व्हावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीचे नोडल ऑफीसर यांनी आपल्या दि. २०.१२.२०११ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने शेतीपंपासाठी दि. २८.८.२०१० रोजी चलन भरल्याचे व दि. २३.५.२०११ रोजी चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. त्यांचे एकूण ०.६६ कि.मी. चे काम आहे. संख उप विभाग हे अत्यंत दुर्गम ठिकाणी असल्याने तेथे काम करण्यास कोणतेही कंत्राटदार सहजासहजी तयार नसतात. परंतु त्यांचे काम सध्याच्या कंत्राटदारास वेळेत पूर्ण करण्यास सांगितले आहे त्यानुसार तक्रारदार ग्राहकाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन देण्यात येईल असे म्हटले आहे. ग्राहकाची नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. २७.१२.२०११ रोजी घेण्यात आली. त्यावेळी नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता कवठे महांकाळ विभाग, श्री. भोसले उपस्थित. ग्राहक गैरहजर. वि.प.चे अधिकारी श्री. भोसले यांनी ग्राहकाचे एच.टी./ एल.टी.चे काम आहे, ते दि. १६.२.२०१२ पर्यंत पूर्ण करुन वीज जोडणी देण्यात येईल असे सांगितले. त्यामुळे भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाची विलंबाबद्दल भरपाईची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे आदेश

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने दि. २८.८.२०१० रोजी शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन रु. ५०००/- भरले आहे व चाचणी अहवाल दि. २३.५.२०११ रोजी दिला आहे. अंदाजपत्रकामध्ये जादा रोहित्र मंजूर आहे, ते काम पूर्ण झाले आहे तरीही ग्राहकास वीज जोडणी दिलेली नाही. रोहित्र मंजूर करुन वीज जोडणी देण्यास वि.प.ला अधिनियमानुसार १ वर्षाची मुदत आहे ती संपली असल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अंतर्गत कक्षाने दि. २८.६.२०११ रोजी आदेश देऊनही अर्जदार ग्राहकास वीज जोडणी दिलेली नाही. त्यामुळे विलंब निश्चित झाला आहे. परिणामी विलंबापोटी भरपाई मिळण्यास ग्राहक हक्कदार आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. १६.२.२०१२ पर्यंत काम पूर्ण करुन वीज जोडणी देत असल्याचे मंचासमोर सांगितले आहे. त्यामुळे १ वर्षाचा कालावधी सोडून उर्वरीत कालावधीसाठी ग्राहकाला भरपाईची रक्कम कृती मानके विनियमानुसार मंजूर करणे योग्य आहे. परंतु वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. १६.२.२०१२ पर्यंत वीज जोडणी देऊन तसा कार्यपूर्ती अहवाल मंचास देण्यास तयारी दर्शविली आहे. त्यामुळे ग्राहकास मिळणारी भरपाई माफ करणे संयुक्तिक होईल असे मंचाचे मत झाले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय व मुद्दा क्र.२ चे उत्तर नाही असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे तक्रारदार ग्राहकास दि. १६.२.२०१२ पर्यंत त्यांची शेत जमीन गट क्र. ५८७ येथे शेतीपंपास नवीन वीज जोडणी देवून विद्युत पुरवठा करावा व त्याचा अहवाल मंचास सादर करावा

३) ग्राहकाने मागणी केलेली विलंबापोटी भरपाईची मागणी फेटाळयात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com